नाटयनिर्मिती संस्थांना नवीन नाट्य निर्मितीसाठी अनुदान योजना प्रयोग अनुदान मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. नासंअ ४८१९/प्र.क्र.२२४/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. नानिअ २०१२/प्र. क्र. २५०/सां.का.४, दिनांक १९ जानेवारी, २०१६.
२) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे पत्र क्र. सां.का.सं/२६४१, दिनांक ३० जुलै, २०१९.

प्रस्तावना :-

उपर्निर्दिष्ट क्र.१ येथील शासन निर्णयान्वये नाट्य निर्मिती संस्थांना नवीन नाटकांच्या निर्मितीसाठी अनुदान मंजूर करण्याची नियमावली निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार गठीत करण्यात आलेल्या नाट्य परिक्षण समितीमार्फत परीक्षण करून नाटकाचा दर्जा ठरविला जातो. सदर परीक्षणाअंती दर्जा प्राप्त नाटकांना विहीत प्रयोगांसाठी अनुदान मंजूर केले जाते. नाट्य परीक्षण समितीमार्फत दर्जा प्राप्त ठरलेल्या नाटकांना विषयांकित नियमावलीत विहीत केलेल्या प्रयोग संख्येच्या टप्प्यानुसार अनुदान मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

"नाट्यनिर्मिती संस्थांना नवीन नाट्य निर्मितीसाठी अनुदान" या योजनेंतर्गत खालील नाट्य संस्थेच्या दर्जा प्राप्त नाटकांस खालील नमूद तपशिलानुसार, या शासन निर्णयान्वये रुपये १४,२५,०००/- (चौदा लाख पंचवीस हजार फक्त) इतके अनुदान मंजुर करण्यात येत आहे.

अ. क्र.	संस्थेचे नाव	नाटकाचे नाव	दर्जा	एकूण प्रयोग	एका प्रयोगासाठी अनुदान रुपये	एकूण रक्कम रुपये
१.	अष्टविनायक, मुंबई	व्हॅक्युम क्लीनर	अ	१०	२५,०००/-	२,५०,०००/-
२.	श्री. चिंतामणी, मुंबई	तिला काही सांगायचय	अ	१०	२५,०००/-	२,५०,०००/-
३.	नाटयगंधा कला मंच, मुंबई	संगीत चि. सौ. का. रंगभूमी	अ	१०	२५,०००/-	२,५०,०००/-
४.	सुधीर भट थिएटर्स, मुंबई	अनन्या	अ	२५	२५,०००/-	६,२५,०००/-
					एकूण रुपये	**१४,२५,०००/-**

२. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कृपया घोषित करण्यात येईल.

३. या योजनेवर होणारा खर्च मागणी क्र.झेड डी-२, २२०५, कला व सांस्कृतिक संस्था, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना- कला व सांस्कृतिक संस्था - (०५) कला व सांस्कृतिक संस्थांना सहाय्यक अनुदान (०५) (०१) कला व सांस्कृतिक कार्य संस्थांना सहाय्यक अनुदान (२२०५ १६२३) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), या लेखाशीर्षाखालील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग-३, अ.क्र.४, परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दि. ०८ जुलै, २०१९ मधील सर्व परिच्छेद व परिशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०९१११८१९४३९३२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.09.13 16:25:15 +05'30'

(विलास रा. थोरात)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११. निवड नस्ती, सां.का.४.